नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ६५ Issue - 65 | वार - बुधवार दि. २९ जुलै २०२६ Blow- Wednesday Date 29 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

॥ श्री स्वामी समर्थ ॥





श्री अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्ट
नोंदणी क्र. ए-७३१, सोलापूर (स्थापना – १९७६)

अक्कलकोट गुरुपौर्णिमा महोत्सव

"श्री स्वामी समर्थ सूर्यमणी व पादुका दर्शन सोहळा"

बुधवार २९ जुलै २०२६

स्थळ : श्री गणेश पंचायतन मंदिर, जुना राजवाडा परिसर अक्कलकोट

सकाळी ९ ते सायं ७ वा.

परंपरेनुसार गुरुपौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त अक्कलकोट राजघराण्याने भक्तीभावाने जतन केलेल्या श्री स्वामी समर्थांच्या सूर्यमणी व पादुकांचे दिव्य दर्शन घेण्याची सुवर्णसंधी सर्व भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. या मंगलमय सोहळ्याचा लाभ घेऊन श्री स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

विशेष आकर्षण



गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर श्री स्वामी समर्थांच्या सानिध्याने पावन झालेली
ऐतिहासिक वास्तू – "जुना राजवाडा"
प्रथमच भाविकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात येत आहे.

स्थळ : जुना राजवाडा, फत्तेसिंह चौक, अक्कलकोट
वेळ : सकाळी ९.०० ते सायंकाळी ७.००



AKALKOT
सत्यमेव जयते

अक्कलकोट नरेश
श्रीमंत मालोजीराजे तिसरे संयुक्ताराजे भोसले
राजेसाहेब अक्कलकोट

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### नवे चलन

भारतीय चलन व्यवस्थेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. ₹१० आणि ₹२० च्या प्लास्टिक (पॉलिमर) नोटांच्या चाचणीसाठी केंद्र सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सुरुवातीला प्रत्येकी १०० कोटी (१ अब्ज) प्लास्टिक नोटा प्रायोगिक तत्त्वावर चलनात आणल्या जाणार असून, या नोटांची भारतीय हवामान आणि वापराच्या परिस्थितीत कार्यक्षमता तपासली जाणार आहे. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तराद्वारे ही माहिती दिली. ठइख ने पॉलिमर नोटांचा पायलट प्रकल्प राबवण्याचा प्रस्ताव दिला असून, चाचणी यशस्वी झाल्यानंतरच देशभरात त्यांचा व्यापक वापर करण्याबाबत निर्णय घेतला जाईल. ठइख च्या मते, पॉलिमर नोटा पारंपरिक कागदी नोटांच्या तुलनेत अधिक टिकाऊ असतात. त्या लवकर फाटत नाहीत, ओलावा आणि घाण यांचा कमी परिणाम होतो तसेच बनावट नोटा तयार करणेही अधिक कठीण ठरते. त्यामुळे ज्या देशांमध्ये रोख व्यवहारांचे प्रमाण जास्त आहे, तेथे पॉलिमर नोटा अधिक प्रभावी मानल्या जातात. सरकारने याबाबत स्पष्ट केले आहे की, कागदी नोटा बंद करण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. पॉलिमर नोटा या विद्यमान कागदी नोटांसोबतच चलनात राहतील. त्यामुळे नागरिकांनी कागदी नोटा बंद होणार असल्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. आरबीआयने सांगितले की, प्लास्टिक नोटांचा डिजिटल व्यवहारांवर काय परिणाम होईल, याबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढणे शक्य नाही. नोटा प्रत्यक्ष चलनात आल्यानंतरच त्याचा अभ्यास केला जाईल. केंद्रीय बँकेने स्पष्ट केले की, रोख व्यवहार आणि डिजिटल पेमेंट हे एकमेकांचे पर्याय नसून पूरक माध्यम आहेत. भविष्यातही दोन्ही प्रणाली एकत्रितपणे कार्यरत राहतील.

# गुरूपौर्णिमाः भारतातील एक महत्त्वाचा सण

**२९ जुलैः आषाढी पौर्णिमा– गुरुपौर्णिमा विशेष.**
**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुरूदर्शन व गुरूपूजा करण्याच्या हेतूने आषाढ महिन्यातील पौर्णिमेच्या तिथीला गुरुपौर्णिमा आणि व्यास पौर्णिमा म्हटले जाते. वेद व्यास यांना प्रथम गुरुचा दर्जा देण्यात आलेला आहे, कारण त्यांनी संपूर्ण मानव जातीला चार वेदांचे ज्ञान दिले आहे. गुरु म्हणजे अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जाणारी वंदनीय व्यक्ती होय. सदर माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक लेख श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी ईशभक्तांच्या चरणी समर्पित करताहेत... संपादक.

गुरूपौर्णिमा हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ मानले जाते. कारण सद्गुरू हेच परमात्म्याचे सगुण साकार रुप असते. म्हणूनच गुरुपौर्णिमेला गुरुपूजन केले जाते. भारतात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते. गुरूपुजेला सर्वच धर्मात अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. बौद्ध धम्मात तर हजारो वर्षांपासून गुरूपुजेला विशेष स्थान दिलेले आढळून येते. गुरूचा अर्थच अगदी मस्तकात लख्ख प्रकाश पाडणारा प्रतित होतो. गु म्हणजे काळोख तर रू म्हणजे प्रकाशपुंज होय. सद्गुरु लाभला तर ईश्वरप्राप्ती झाली आणि गुरुला पुजता परमेश्वर प्रसन्न झालाच म्हणून समजा. तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतोच–

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।

हिंदू धर्मात तसे तर सगळ्या पौर्णिमा त्याच्या त्याच्या खास महत्वांनी परिचीत आहेत. या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान केले जाते आणि होम, जप, तप, दान, धर्म यांसाठी खास तिथी मानली जाते. गुरुमंत्र प्राप्त करण्यासाठी देखील हा दिवस फार महत्वाचा ठरतो. या दिवशी आपण ज्यांना आपला गुरु मानतो त्यांचा आदर करावा आणि त्यांना नमस्कार करावा. कारण त्यांनी दिलेल्या ज्ञानातून आपल्या जिवनातला अंधकार नष्ट झालेला असतो आणि गुरुद्वारे भगवंताची प्राप्ती होते. गुरुंनी दिलेल्या ज्ञानाच्या भंडारातूनच आपण जिवनातील प्रत्येक मार्गावर यशस्वीपणे वाटचाल करतो. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत गुरु–शिष्यांची ही परंपरा सुरू आहे. या दिवशी फक्त गुरुंनाच नव्हे तर घरातील प्रत्येक ज्येष्ठ सदस्य, आईवडील आणि आपल्या जीवनात कठीण काळात साथ देणाऱ्या प्रत्येकाला गुरुचा दर्जा देत त्यांचे आभार मानावे, त्यांना नतमस्तक व्हावे. सन्मार्ग आणि परमार्थ प्राप्तीचा गुरोपदेश करताना तथागत गौतम बुद्ध किसीलसुत्तात म्हणतात, की गुरुभेटीचा क्षण जाणा व संधी न गमावता आदरपूर्वक गुरूमुखातून येणारे धार्मिक कथन ऐका. निगर्वीपणे विनम्र होऊन योग्य वेळी गुरूपाशी जावे. सदर्थ, धर्म, संयम व ब्रह्मचर्य यांचे स्मरण ठेवून ती आचरावीत– सुत्त निपातः ३२४ व २२६–

वृद्धापचायी अनुसुय्यको सिया। कालञ्ञऽस्स गरुनं दस्सनाय।।
धम्मिकथं एजयितं खणञ्ञू। सुणेय्य सक्कच्च सुभासितानि।।
कालेन गच्छे गरुनं सकासं। थंभं निरंकत्वा निवातवुत्ति।।
अध्य धमं संयम ब्रह्मचयरिया। अनुस्सरे चेव समाचारे चा।।



ज्या गुरूद्वारे ईश्वरप्राप्ती होते, त्यास सद्गुरू असे म्हणतात. तो संपूर्ण मानवांच्या व जगताच्या कल्याणासाठी अर्थात केवळ परोपकार करण्यासाठी अवतरित होत असतो. त्याने दिलेले ब्रह्मज्ञान हे दिव्यज्ञान असते. शिष्य जसा त्याचा वापर करेल तसा त्याचा परिणाम त्याच्या जीवनात दिसून येईल. तप्त लोहाच्या गोळ्याप्रमाणे ते असते. त्यापासून सुईसारखे हत्यार घडविल्यास ते जोडण्याच्या कामी पडते. तर सुरी घडविल्यास ती तोडते. सद्गुरूला मात्र मनाशी मने व माणसाशी माणसे जोडणारा शिष्य अपेक्षित असते. तेव्हाच ब्रह्मज्ञान सत्कारणी लागले, असे म्हणता येते, अन्यथा नाही. तप्त लोहगोळ्यावर काहीच प्रक्रिया केली नाही तर तो थंड होऊन निरुपयोगी ठरतो. अगदी तसेच या ब्रह्मज्ञानाचे सुद्धा आहे. म्हणून त्याचा उपयोग जनकल्याण साधन्याच्या कामी केला पाहिजे. स्वार्थापेक्षा परमार्थ अधिक पटीने साधला पाहिजे. शिष्याने आपल्या दैनंदिन जीवनात चुकल्या–माखल्याची क्षमायाचना या गुरूपूजेच्या पावन समयी केली पाहिजे. कारण जगद्गुरू संत तुकाराम महाराज सांगतात–

सद्गुरूवांचोनि सापडेना सोय!
धरावे ते पाय आधी आधी!!

ब्रह्मज्ञान मिळाल्यावरच खऱ्या भक्तीला सुरवात होत असते, अन्यथा पालथ्या घड्यावरचे पाणी ठरते. आपल्या भक्तीला नटवण्या–थटवण्याचे काम आपले सत्कर्म करीत असतात. तर आपल्या भक्तीला बदनाम व वाया दवडण्याचे काम आपले दुष्कर्म करतात. म्हणून दुष्कर्मांचा अव्हेर केला पाहिजे. समोरचे मनोहारी दृश्य बघण्यासाठी लोक गर्दी करतात. अशावेळी आई बाळाला कडेवर घेत असते. तर वडील मुलाला खांद्यावर घेत असतात. याबाबत त्यांना प्रश्न केले, की असे का? तर ते कृपाळू मायबाप मोठ्या महत्वाकांक्षेने सांगत असतात, की आपण जे पाहू शकलो नाही. ते आपल्या लाडक्या मुलांनी पाहावे. आहे की नाही हे नवल? किती हे औदार्य, किती ही दया! मायबापांची जशी अपेक्षा व महत्वाकांक्षा तशीच सद्गुरूची पण असते. मायबापांनी कड्या–खांद्यावर घेतलेल्या मुलांनी मात्र अपेक्षेप्रमाणे जे डोळ्यांत साठवायचे आहे, नेमके तेच दृश्य साठवले पाहिजे. तरच ते कष्ट सार्थकी ठरले म्हणावे. जर मुलांनी लोकांचे काळे–गोरेपणा, साधे–झकपक पोषाख, काळे–पांढरे केस आदी गोष्टीच न्याहाळत राहिले. तर मात्र मायबापांचे परिश्रम, इच्छा व महत्वाकांक्षा पार धुळीस मिसळून गेले की हो! यशस्वी जीवनात अशा मौलिक संधी आणि उपलब्धता या केवळ गुरूद्वारे मिळालेल्या ज्ञानामुळे शक्य झाले. ही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरूला नमन करण्याचा, गुरू पूजन करण्याचा हा गुरुपौर्णिमा सण आहे. मायबाप, पालक, मार्गदर्शक हे सगळेच गुरुस्थानी मानावे. ज्याला गुरू नाही, असा मनुष्य जगात शोधूनही सापडणार नाही. गुरू सहजच कितीतरी मिळतात, मात्र सद्गुरू सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेऊन मिळवावा लागतो. संतशिरोमणी अवतारसिंहजी महाराज समजावतात– सम्पूर्ण अवतारबाणीः पद क्र. १४१– ओवी ९ व १० वी–

रीझ जाय यदि सद्गुरू अपना रीझ गया समझो भगवान!
कहे 'अवतार' गुरु कृपा से कण मिट्टी का गगन समान।

खरे गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सद्गुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द शिरसावंद्य मानून त्यावर चालणे म्हणजे खरे गुरुपूजन! खरे तर गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, गुरूगीतेत म्हटलेच आहे–

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा।।

!! गुरुपौर्णिमा निमित्ताने सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा जी !!

**– श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे (से. नि. प्राथ. शिक्षक)**
**आध्यात्मिक विचारांचे प्रकटक.**
**रामनगर– गडचिरोली. मधुभाष– ९६९९८३६७१७.**

# किरणोत्सर्गी समस्थानिकांचा उपयोग





अणुऊर्जेसंबंधी संशोधन करून अणुऊर्जेचा वापर करण्यास उत्तेजन देणारी व सर्व प्रकारची मदत करणारी आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था दि.२९ जुलै १९५७ रोजी व्हिएन्ना येथे सुरू झाली. भारत आणि जगातील बहुतेक सर्व राष्ट्रे या संस्थेचे सभासद आहेत. या संस्थेला संयुक्त राष्ट्रांची मान्यता मिळालेली आहे.

**(२९ जुलैः इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी स्थापना विशेष.)**

संस्थेची सर्वसाधारण व्यवस्था पाहण्याकरिता एक सर्वसाधारण मंडळ आहे. या मंडळात सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात. या मंडळाची बैठक साधारणतः वर्षातून एकदाच भरते परंतु विशेष काम असल्यास आणखी केव्हाही भरविता येते. वार्षिक सभेमध्ये पुढील वर्षाचा कार्यक्रम, खर्चाचे अंदाजपत्रक व सभासदांसंबंधीचे धोरण ठरविले जाते. संयुक्त राष्ट्राकडे पाठवावयाचा वार्षिक अहवाल संयुक्त राष्ट्रे व इतर संस्थांबरोबर केलेल्या करारांसंबंधी विचारविनिमय करून त्यांना मान्यता देण्यात येते. हे मंडळ आपल्यातूनच एक नियंत्रक मंडळ निवडते. हे नियंत्रक मंडळ एका संचालकाची निवड करते. या निवडीला सर्वसाधारण मंडळाची मान्यता असावी लागते. संचालकाची नेमणूक चार वर्षांकरिता असते. हा संचालक संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करतो व त्यांच्या सर्व कामावरही लक्ष ठेवतो. ही सार्वजनिक आरोग्य व इतर सर्व अविनाशक उद्योगांच्या उत्कर्षाकरिता

या संस्थेतर्फे सीबर्सडॉर्फ व व्हिएन्ना येथे दोन मोठ्या प्रयोगशाळा चालविण्यात येतात. याशिवाय दोन वहनसुलभ स्वरूपाच्या प्रयोगशाळा असून त्या बाहेरगावच्या कामासाठी वापरता येतात. मुख्य प्रयोगशाळेमध्ये भौतिकी, रसायनशास्त्र, कृषिविज्ञान, वैद्यक, पाणीपुरवठा, समस्थानिक– अणुक्रमांक तोच पण अणुभार भिन्न असलेला त्या मूलद्रव्याचा प्रकार, संरक्षक योजना अशा मुख्य शाखा आहेत. या प्रयोगशाळेत सर्व सभासद राष्ट्रांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्याही देण्यात येतात. अरब राष्ट्रांकरिता कैरो येथे एक स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येते व ट्रिएस्ट येथे जागतिक स्वरूपाचे एक खास केंद्र असून तेथे सैद्धांतिक भौतिकीचा विशेष अभ्यास करण्याची सोय केलेली आहे. मोनॅको येथील फ्रेंच सरकारच्या मदतीने चालणाऱ्या सागरी संस्थेमध्ये या संस्थेच्या वतीने सागरी जीवशास्त्रासंबंधी संशोधन करण्यासाठी एक नवीन प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. व्हिएन्ना येथील प्रयोगशाळेत नवीन अणुकेंद्रीय विक्रियकांचे– अणुभट्ट्यांचे अभिकल्प– आराखडे करण्यात येतात. सभासद राष्ट्रांत उभारावयाच्या अणुकेंद्रीय विक्रियकांच्या प्रकल्पांचे पूर्वपरीक्षण करण्यात येते व ते प्रकल्प समाधानकारक वाटले, तर त्यांना लागणारे साहित्य पुरविण्यात येते. संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने संरक्षक साहित्य आणि कार्यपद्धती यांचे मानकीकरण– मार्गदर्शक प्रमाणभूत नमुना ठरविणे करण्यात येते. अशा साहित्याचा मुख्य उद्देश म्हणजे अणुशक्तीचा उपयोग करणाऱ्या कोणाही कर्मचाऱ्यास शारीरिक इजा होऊ नये व त्याच्या जीवास कसलाही धोका असून नये हा असतो. संस्थेतर्फे संरक्षणाच्या दृष्टीने संशयित वस्तूंची तपासणी करण्यात येते व तपासणी करण्याच्या साहित्याचे उत्पादनही करण्यात येते.

वैद्यक विभागात चिकित्सेकरिता किरणोत्सर्गी न्यूक्लाइडांचा– अल्पकाल टिकणाऱ्या किरणोत्सर्गी अणूंचा कसा उपयोग करता येईल? यासंबंधी संशोधन करण्यात येते. निरनिराळ्या देशांतील परिस्थितीप्रमाणे पांडुरोग– ॲनिमिया, गलगंड, परजीवीशास्त्र– दुसऱ्यांवर उपजिविका करणाऱ्या सजीवांसंबंधीचे शास्त्र, अपपोषण– पोषणास आवश्यक असणाऱ्या द्रव्यांच्या अभावामुळे निर्माण होणारी स्थिती, अशा विविध विषयांसंबंधी प्रयोग करण्यात येतात. पाणीपुरवठा विभागात किरणोत्सर्गी समस्थानिकांचा उपयोग करून पाणीपुरवठा सुधारण्यासाठी निरनिराळ्या देशांतील परिस्थितीप्रमाणे अनेक प्रयोग करण्यात येतात व सभासद राष्ट्रांतील योजनांना मदत करण्यात येते. कृषिविज्ञान शाखेत भात व मका या धान्यांच्या बाबतीत खतांचे शोषण कितपत होते यासंबंधी संशोधन चालते. याशिवाय वनस्पती खाणाऱ्या किडींचा नाश करण्याच्या पद्धतींसंबंधी संशोधन चालते. किरणोत्सर्गी– कण वा किरण बाहेर टाकणाऱ्या समस्थानिकांच्या मदतीने वनस्पतींची वाढ, नव्या जातींचे उत्पादन, रोगनिवारण वगैरे विषयांवरही प्रयोग करण्यात येतात. खाद्यवस्तूंवर किरणोत्सर्गाची प्रक्रिया करून त्या टिकविण्यासंबंधी आणि त्यांतील विषारी द्रव्यांचा नाश करण्यासंबंधी संशोधन करण्यात येते. इतर विभागांत किरणोत्सर्गी द्रव्ये हवेत मिसळल्याने किंवा अन्नात गेल्याने मनुष्याला कसा अपाय होऊ शकतो? यासंबंधी सतत अभ्यास चालू असतो. किरणोत्सर्गी द्रव्ये दुसऱ्या ठिकाणी नेताना त्यांच्यापासून इतर लोकांना उपद्रव झाल्यास कोणते कायदेशीर उपाय योजावेत? यासंबंधी व्हिएन्ना येथे मुद्दाम भरविलेल्या परिषदेने केलेल्या ठरावास संस्थेतर्फे अधिकृत मान्यता देण्यात आली. या ठरावात जमिनीवरचे अणुकेंद्रीय विक्रियक व जहाजात बसविलेल्या अणुकेंद्रीय विक्रियकांचाही विचार केलेला आहे. किरणोत्सर्गी द्रव्यांची ने–आण करण्याच्या पद्धती व निरुपयोगी झालेल्या द्रव्यांची विल्हेवाट लावण्याच्या विशेष पद्धती यासंबंधी संस्थेने बऱ्याच पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. संस्थेतर्फे किरणोत्सर्गी द्रव्यांचे व मापन पद्धतींचे मानकीकरण, मापक उपकरणांची तपासणी, संशयित द्रव्यांची तपासणी अशी विविध कामे सतत करण्यात येतात.

या संस्थेच्या मुख्य उद्देशाप्रमाणे ही संस्था सभासद राष्ट्रांच्या गरजेप्रमाणे त्यांना अणुकेंद्रीय विक्रियकांची सामग्री, तांत्रिक माहिती व योग्य अधिकारी माणसे पुरविण्याचे काम करते. याकरिता शक्य असेल त्या राष्ट्रांनीही संस्थेला उपयोगी पडणारी किरणोत्सर्गी द्रव्ये पुरवावी, अशी अपेक्षा असते. अशा द्रव्यांची किंमत संस्थेने ठरविलेल्या दराप्रमाणे देण्यात येते. संस्थेकडे येणाऱ्या सर्व द्रव्यांची नीट साठवण करून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संस्थेवर असते. या संस्थेकडे येणाऱ्या मालामध्ये युरेनियम, रेडियम अशा अनेक दुर्मिळ व अतिमौल्यवान धातूंचा समावेश होत असल्याने त्या धातू कोठारातून अनधिकृत मार्गाने बाहेर जाण्याची पुष्कळ शक्यता असते. याकरिता संस्थेला विशेष काळजी घ्यावी लागते. अशी मौल्यवान द्रव्ये जगातील निरनिराळ्या भागांत विभागून ठेवतात व कोणत्याही एका ठिकाणी मोठा साठा होणार नाही, अशी खबरदारी घेतात. कोणत्याही सभासद राष्ट्राला अणुकेंद्रीय विक्रियकासारखा नवा प्रकल्प सुरू करावयाचा असला, तर या संस्थेकडे युरेनियम सारख्या दुर्मिळ द्रव्याची मागणी करता येते. अशी मागणी आली म्हणजे ही संस्था त्या प्रकल्पाची सर्व माहिती मिळविण्याकरिता त्या राष्ट्रात आपले तंत्रज्ञ पाठविते. तंत्रज्ञांना सर्व माहिती मिळाल्यावर तो प्रकल्प समाधानकारक वाटल्यास ही संस्था त्या प्रकल्पाकरिता लागणारे सर्व साहित्य पुरविते. जरूर असल्यास तांत्रिक माहिती व सल्लागार मंडळही पुरविते. अशा वेळी संस्थेला काही विशेष हक्क असतात व काही जबाबदारीही असते. अशा नव्या प्रकल्पात उभारावयाच्या अणुकेंद्रीय विक्रियकांच्या अभिकल्पाचे परीक्षण करून व त्याबरोबरच्या इतर संरक्षक योजनांची पाहणी करून त्यांचा उपयोग विनाशक कार्याकडे होऊ शकणार नाही व त्यापासून कर्मचाऱ्यांना कसलीही इजा होणार नाही याबद्दल खात्री करून घ्यावी लागते. याकरिता संस्थेला त्या राष्ट्रात आपले निरीक्षक पाठविण्याचा हक्क असतो. अशा निरीक्षकांना त्या राष्ट्रात कोणाही संबंधित व्यक्तीची मुलाखत घेण्यास त्या राष्ट्राने परवानगी द्यावी लागते. याशिवाय संस्थेला आपले कार्य पूर्ण करण्यासाठी त्या राष्ट्रामध्ये काही विशेष कायदेशीर हक्क मिळतात आणि विशेष सवलतीही मिळतात. या संबंधात काही वाद निर्माण झाला किंवा तो आपापसातील तडजोडीने मिटविता आला नाही, तर तो वाद आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविला जातो.

सभासदांच्या उपयोगासाठी संस्थेचे एक मोठे ग्रंथालय आहे. त्यात जवळजवळ एक लाख ग्रंथांचा संग्रह उपलब्ध आहे. याशिवाय तेथे निरनिराळ्या विषयांवरील तीनशे चित्रपटांचा संग्रह उपलब्ध आहे. या संस्थेतर्फे सर्व संशोधनासंबंधी अहवाल प्रसिद्ध करण्यात येतात. ॲटॉमिक एनर्जी हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येते आणि इतर विविध कार्यासंबंधी अनेक पुस्तके प्रसिद्ध करण्यात येतात, हे उल्लेखनीय! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !!

!! इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी स्थापना निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा जी !!

**– श्री एन. कृष्णकुमार, से.नि. अध्यापक.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी– ९६९९८३६७१७.**

# कोणी रस्ता देता का रस्ता सारणी ग्रामस्थांची शासन दरबारी हाक



**रस्ता नाही फक्त चिखल सारणी भाग एक ते सारणी भाग दोन तीन किलोमीटर दरम्यान रस्ता अर्धवट अवस्थेत**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने शाळकरी विद्यार्थी शेतकरी व वयोवृद्ध नागरिकांना जाण्यासाठी जीव मुठीत धरून कसरत करावी लागत आहे.

सारणी ते जुनी सारणी तीन किमी चा रस्ता अर्धवट अवस्थेत असून नागरिकांना रस्त्याचे दुरवस्था कायम आहे.

त्यामुळे नागरिक त्रस्त असून आंदोलनाच्या पवित्रात आहेत.

सारणी गावचा रस्त्याचे अवस्था अनेक वर्षापासून दुरवस्था झाल्या असून दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यावर खड्ड्यात पाणी व चिखल असून विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना हा त्रास सहन करावा लागत आहे.

**सारणी गावासाठी रस्ता मंजूर करण्यासाठी वेळोवेळी शासन दरबारी पाठ पुरावा करत असून आजपर्यंत रस्ता मंजूर झाला नाही आमदार अभिमन्यू पवार साहेब यांना भेटलो असता लवकरच रस्त्याच काम सुरु होईल म्हणून सांगण्यात आले.**
**– सरपंच तुकाराम वागमारे**
**ग्रामपंचायत कार्यालय सारणी**

शाळेतील विद्यार्थी हे जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.

या रस्त्यावर अनेक दिवसापासून खड्डे पडले आहेत रस्त्याचे काम व व्हावं म्हणून नागरिकांनी वेळोवेळी पाठपुरावा करून देखील आजपर्यंत रस्त्याचे काम झालेलं नाही.

मतदानापुरतेच सारणी गावची आठवण राहते की काय असे सारणी ग्रामस्थांना प्रश्न पडला आहे.

**धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर साहेब यांनी पॅनलच्या रस्त्याची एन ओ सी काढून दिलेली आहेत परंतु अद्याप परेंत कोणत ही काम झालेलं नाही**
**– माजी सरपंच**
**राजेंद्र बिराजदार**

सारणी गावाला रस्ता नसल्यामुळे गावामध्ये कोणी मुली देण्यास तयार नाहीत व गावचा अवस्था ही न राहण्यासाठी घर नाक जाण्यासाठी रस्ता अशी सारणी गावातील नागरिकांची अवस्था झालेली आहे सारणी गावातील पुढारी हे या रस्त्याकडे जाणून–बुजून दुर्लक्ष करताना दिसत आहेत औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार म्हणून ओळख असणारे आमदार अभिमन्यू पवार या गावाकडे लक्ष देतील का व गावाला रस्त्याची रस्त्याचे काम करतील का ह्या अपेक्षांनी सारणी गावातील नागरिक वाट पाहत आहेत लातूर जिल्ह्याचे टोकाचे गाव हे सारणी गाव आहे विविध शासकीय कामे देखील गावात राबत नसून हे गाव सुख सुविधेपासून वंचित आहे.

**जर रस्त्याच काम लवकरात लवकर नाही चालू झालं तर लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल**
**– ग्रामस्थ व माझी सैनिक**
**नाना पाटील**

औसा तालुका चे आमदार व धाराशिव जिल्ह्याचे खासदार या गावाकडे विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यांचे व शेतकऱ्यांचे व गावातील नागरिकांचे दळणवळणाची सुविधा करून गावाला एक रस्ता करून देतील का अशा अपेक्षणी गावातील नागरिक प्रतिक्षित आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भीमा व नीरा नदीतून वाहून जाणाऱ्या पाण्याने तलाव, ओढे, नाले भरून द्या - आमदार अवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - मंगळवेढा/प्रतिनिधी : भीमा व निरा नद्यांमधून वाहून जाणारे पाणी कॅनॉल मार्गे सोडून मतदारसंघातील नाले ओढे,तलाव भरून देण्यात यावेत अशी मागणी आ समाधान आवताडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्याकडे मागणी केली आहे.



पावसाळा सुरु होऊन दीड महिन्याचा काळ लोटला असून अद्याप पंढरपूर मंगळवेढा तालुके दुष्काळ ग्रस्त आहेत या भागाला पावसाने दडी मारल्याने येथील खरीप हंगाम यंदा वाया गेल्यात जमा आहे काही भागात पिण्याच्या पाण्यासाठीही कसरत करावी लागत आहे अशा परिस्थितीत उजनीचे पाणी कॅनॉल ला सोडण्यात आले आहे त्यामुळे या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

एनआरबीसी म्हणजेच निरा-भाटघर अंतर्गत नीरा नदी पूर्णपणे पाण्याने भरली असून एनआरबीसी तून रांझणी तलावापासून ते मतदार संघातील सर्व कासेगाव तलाव, कोर्टी तलाव, गादेगाव तलाव, बोहाळी तलाव, ७ नं फाटा या भागासह सर्व तालुक्यातील साठवण तलाव, पाझर तलाव छोटे-मोठे नाले व तिसंगी येथील साठवण तलाव भरून एनआरबीसी तून देण्यात यावेत.

उजनीतून येणाऱ्या पाण्यातून भीमा नदीला ही पाणी सोडले असून कॅनॉल ला ही पाणी सुरु आहे मात्र ते पाणी कमी दाबाने सुरु असून हें पाणी पूर्ण दाबाने सोडून मंगळवेढा तालुक्यातील नंदूर, बोराळे, कर्जाळ, कात्राळ, हुलजंती टेल भागासह या संपूर्ण मतदारसंघातील ओढे, नाले तसेच विविध पाझर तलाव तसेच पंढरपूर तालुक्यातील वाखरी, गादेगांव पर्यंत ओढे नाले साठवण तलाव, पाझर तलाव भरून देण्यासंदर्भात आपल्या विभागाला सूचित करावे अशी मागणी आ आवताडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे केली आहे.

# सोलापूर भारत स्काऊट्स अँड गाईड्स जिल्हा कार्यालय सोलापूरच्या वतीने आषाढी वारी स्वच्छता सेवा प्रकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर भारत स्काऊट्स अँड गाईड्स जिल्हा कार्यालय सोलापूरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सन २०२६-२७ आषाढी वारी स्वच्छता सेवा प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले.

सदरील स्वच्छता सेवा प्रकल्पासाठी शिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा मुख्य आयुक्त मा.श्री कादर शेख साहेब, शिक्षणाधिकारी माध्य. तथा जिल्हा आयुक्त स्काऊट मा.श्री सचिन जगताप साहेब, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा आयुक्त गाईड मा.श्रीमती रूपाली भावसार मॅडम, उपशिक्षणाधिकारी माध्य. तथा जिल्हा चिटणीस मा. श्री विठ्ठल ढेपे साहेब, लेखाधिकारी समग्र शिक्षा अभियान तथा जिल्हा कोषाध्यक्ष मा.श्री राहुल सलगर साहेब, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट मा. श्री शंकर यादव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड मा. श्रीमती सुलक्षणा लोखंडे मॅडम, जिल्हा संघटक स्काऊट मा. श्री श्रीधर मोरे साहेब व जिल्हा संघटक गाईड मा.श्रीमती अनुसया सिरसाठ मॅडम व मा. श्री रशीद पठाण सर जिल्हा आयुक्त रोहर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८/७/२०२६ रोजी उत्साहात पार पडला.




सदर स्वच्छता अभियानास नगरपालिका मुख्याधिकारी मा. श्री महेश रोकडे साहेब व पंढरपूर गटशिक्षणाधिकारी श्री रणदिवे साहेब यांनी स्वछता रॅलीचे हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन केले.

यावेळी श्रीमल्लकार्जुन हायस्कूल सोलापूर, श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर, माध्यमिक प्रशाला वडवळ, जि.प. प्रा. शाळा बारडी, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला मोहोळ, विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पंढरपूर, श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पंढरपूर, श्री स्वामी समर्थ प्रशाला आरळी, रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब, न्यू इंग्लिश स्कूल करकंब, श्री दुर्गा शिशु विहार प्राथमिक शाळा इसबावी, कर्मवीर विद्यालय चारे, श्री गगनगिरी विद्यालय सांगवी, दत्त विद्या मंदिर सुस्ते ,लोटस इंग्लिश स्कूल कासेगाव व सांगोला विद्यामंदिर प्रशाला सांगोला इ. शाळेतील ८५२ स्काऊट व गाईड व ९२ शिक्षक शिक्षिका यांनी सहभाग घेतला होता. हे स्वछता अभियान यशस्वी करण्यासाठी श्री महादेव पुजारी सर, श्री यंपे सर, श्री. समाधान बेद्रे सर, श्री महेश भोसले सर, श्री बाळासाहेब शिंगाडे सर श्री.अशपाक मुजावर सर यांनी स्वच्छता सेवा प्रकल्पास परिश्रम घेतले.

# टाकळीवाडीत जनावरे वांझ तपासणी शिबिर व वैरण बियाणे वाटप मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाड/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे पशुपालक शेतकऱ्यांच्या हितासाठी जनावरे वांझ तपासणी शिबिर तसेच वैरण बियाणे वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाला परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शिबिरामध्ये पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विष्णू निर्मळे यांनी जनावरांची तपासणी करून वांझपणावरील उपचार, योग्य आहार, लसीकरण, रोगप्रतिबंधक उपाय तसेच आधुनिक पशुपालनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पशुपालकांना दर्जेदार वैरण उत्पादनासाठी वैरण बियाण्यांचेही वाटप करण्यात आले.




या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य बाबासाहेब वनकोरे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विष्णू निर्मळे, समस्त ग्रामस्थ तसेच परिसरातील पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे जनावरांचे आरोग्य सुधारण्यास, दूध उत्पादन वाढण्यास तसेच पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे ग्रामस्थांनी कौतुक केले

# पद्मश्री भिकल्या धिंडा यांच्या निवासस्थानी शिक्षकांच्या शिष्टमंडळाची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारत सरकारचा पद्मश्री पुरस्काराने सन्मानित भिकल्या लाडक्या धिंडा (वय ९०+) हे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील वाळवंडे गावचे प्रसिद्ध आदिवासी तारपा वादक आहेत.वारली संस्कृतीचा अभिमान असलेल्या या लोककलेला त्यांनी सातासमुद्रापार नेले आहे.



या कारणास्तव शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाची पवित्र सेवा करत असतांना विद्यार्थ्यांना देखील या कलेविषयी माहिती देण्यासाठी निफाड तालुक्यातील शिक्षकांनी दुर्गम भागात असलेल्या पद्मश्री भिकल्या धिंडा यांच्या निवासस्थानी भेट देऊन तारपा ह्या आदिवासी वाद्य व कलेविषयी विस्तृत माहिती जाणून घेतली.

पद्मश्री भिकल्या धिंडा हे पारंपरिक 'तारपा' वाद्याचे अत्यंत कुशल वादक असून त्यांनी ही आदिम कला टिकवून ठेवली आहे.भिकल्या धिंडा यांच्या निस्वार्थी कार्याची आणि सातत्यपूर्ण साधनेची दखल घेऊन सरकारने त्यांना 'पद्मश्री' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे.यावेळी पद्मश्री भिकल्या धिंडा हे परगावी गेले असल्याकारणाने त्याची भेट झाली नाही,परंतु त्यांच्या कुटुंबीयांनी अतिशय आपुलकीने तारपा वाद्य दाखवून सदर कलेविषयी विस्तृत माहिती दिली.

## आदिम कला व आदिवासी तारपा वाद्याची जाणून घेतली माहिती

याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षकनेते शिवाजीराव निरगुडे, कैलास भारती,नगरसेवक व चेअरमन साहेबराव बर्डे, श्री माणकेश्वर वाचनालयाचे सहचिटणीस राहुल दवते, भगीरथ सोनवणे,भाऊसाहेब पानसरे आदी उपस्थित होते.

# माजी नायब सुभेदार केंदबा कांबळे, माजी अर्नरी कॅप्टन रमेश निर्मळे यांना 'सैनिक रत्न' पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सुपुत्र देशसेवेत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल टाकळीवाडी येथील माजी नायब सुभेदार केंदबा कांबळे आणि माजी अर्नरी कॅप्टन रमेश निर्मळे यांना प्रतिष्ठेचा 'सैनिक रत्न' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




माननीय ब्रिगेडर सुधीर सावंत (माजी खासदार) तसेच सरदार चोपडे, शिवसेना माजी सैनिक सेल महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यांच्या हस्ते दोन्ही माजी सैनिकांना 'सैनिक रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशासाठी केलेली प्रदीर्घ व समर्पित सेवा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि समाजाप्रती असलेले योगदान याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर केंदबा कांबळे आणि रमेश निर्मळे यांनी हा सन्मान सर्व माजी सैनिक आणि देशसेवेसाठी कार्यरत जवानांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. निवृत्तीनंतरही सामाजिक कार्यातून राष्ट्रसेवेची प्रेरणा जपण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या सन्मानाबद्दल टाकळीवाडीसह परिसरातील ग्रामस्थ, माजी सैनिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी दोघांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पुरस्कारामुळे टाकळीवाडीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कळंब येथे सत्या सामाजिक संस्थेचा आगळा वेगळा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने कळंब येथील सत्या सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने एक आगळा वेगळा उपक्रम राबवला. संस्थेच्या वतीने कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद व इतर शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या ११०० शिक्षकांना लेखणी व शुभेच्छापत्र भेट म्हणून पाठवण्यात आले.

## ११०० शिक्षकांना गुरुपौर्णिमेनिमित्त पेन व शुभेच्छापत्र भेट

बदलत्या युगात शिक्षण क्षेत्रावर आणि शिक्षकांवर अतिरिक्त ताण असताना, गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांचा सन्मान करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. संस्थेच्या या उपक्रमामुळे तालुक्यातील शिक्षकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. चेतन कात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यासाठी जीवन घुले, अक्षय उर्फ बापू घुले, सुजल घुले, विशाल पुरेकर, सचिन महाजन, शंकर उर्फ दादा खंडागळे आदी सदस्यांनी विशेष पुढाकार घेतला.



**शिक्षकांच्या प्रतिक्रिया**

बापू भंडारे सर, जि. प. कन्हेरवाडी: शाळेसाठी पाठवलेले पेन मिळाले. ते शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना देण्यात आले. मनःपूर्वक आभार.

महेश मिटकरी, रामनगर शाळा कन्हेरवाडी: गुरूंना पाठवलेली भेट पोस्टाद्वारे मिळाली. शिक्षकांनी खूप खूप आभार मानले.

मायाचारी सर, विद्याभवन हायस्कूल, कळंब: आपण दिलेल्या शुभेच्छा आणि भेटवस्तू मिळाल्या. धन्यवाद.

विशाल संगवे सर, जि. प. बोर्डा: आम्हा सर्व गुरुजनांचा आदर केल्याबद्दल संस्थेचे आभार. कौतुकाची ही थाप पुढील कार्यासाठी प्रेरणा देईल.

या सामाजिक संस्थेने शिक्षकांचा असा गौरव केल्याने तालुक्यात सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १८१ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

# सर्व संवैधानिक समूहांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या ५० टक्के आरक्षण धोरणाच्या १२४ व्या वर्धापनदिनानिमित्त राजर्षी छत्रपती शाहू महाराज ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आरक्षणाच्या विचाराचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य या विषयावर १८१ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा २६ जुलै २०२६ रोजी साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात संपन्न झाली.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांसाठी प्रशासनात ५० टक्के नोकऱ्या राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत सामाजिक न्यायाचा पाया घातला. या विचाराला पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात सामाजिक न्याय, समता आणि प्रतिनिधित्वाच्या तत्त्वांद्वारे वैधानिक स्वरूप दिले. संविधानातील कलम १५(४), १६(४), ३३० व ३३२ याद्वारे वंचित घटकांच्या प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात आली आहे. भारताच्या संविधानात ५० टक्के आरक्षणाची मर्यादा नमूद नसून, १९९२ मधील इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून ती विकसित झाली. समताधिष्ठित लोकशाही बळकट करण्यासाठी सर्व संवैधानिक समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व बहाल केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

उद्घाटनपर भाषणात साहित्यिक संतोष पवार यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाचा गौरव करताना शिक्षण, वसतिगृहे आणि आरक्षणाच्या माध्यमातून वंचित समाजाला उभारी देण्याचे त्यांचे योगदान अधोरेखित केले. समाजातील दुर्बल घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाहू महाराजांनी केलेल्या कार्याचे स्मरण प्रत्येक पिढीने ठेवले पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रमुख वक्ते डॉ. कैलाश बनसोडे यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी वंचित घटकांना त्यांच्या हक्काची हिस्सेदारी मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. संविधानाने दिलेल्या अधिकारांविषयी समाजात व्यापक जनजागृती होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर यांनी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करून आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. विक्रम पवार यांनी समाजातील अंतर्गत मतभेद दूर करण्याचे आवाहन केले. राहुल चोपडे यांनी सामाजिक प्रगतीबरोबरच मूल्यांची जपणूक आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. उद्योजक शशिकांत काळे यांनी नोकरीतील आरक्षण ही सत्यशोधक चळवळीच्या सामाजिक संघर्षाची फलश्रुती असल्याचे सांगितले. ॲड. राहुल डी. गायकवाड यांनी माणसाचे मन मोठे असणे हीच खरी सामाजिक प्रगल्भता असल्याचे प्रतिपादन केले, तर ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी मानसिक गुलामगिरीचा त्याग करून स्वाभिमानाने जगण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्रा. विलास कटारे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही वैचारिक प्रबोधनाची परंपरा सातत्याने सुरू असल्याचे सांगितले. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्योजक मिलिंद बागुल यांनी, तर आभार प्रदर्शन उद्योजक शशिकांत काळे यांनी केले. कार्यशाळेला विविध क्षेत्रांतील अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, संशोधक, उद्योजक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी आषाढी वारीत 'पोलीस मित्र' म्हणून बजावली उल्लेखनीय भूमिका

## वारकऱ्यांच्या सेवेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे मोलाचे योगदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहर पोलीस विभागाकडून दि. ०८ जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार आषाढी वारी २०२६ दरम्यान कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियोजन तसेच वारकऱ्यांना सुरक्षित व सुलभ सेवा मिळावी या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'पोलीस मित्र' या उपक्रमात श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी), पंढरपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केले.



दि. २३ जुलै ते २७ जुलै २०२६ या कालावधीत स्वेरीच्या सुमारे २५० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी पंढरपूर शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधत वाहतूक नियंत्रण, वारकऱ्यांना योग्य मार्गदर्शन, हरविलेल्या व्यक्तींना मदत, रस्ते मोकळे ठेवणे, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना सहकार्य करणे तसेच शिस्तबद्ध दर्शन व्यवस्थेसाठी पोलीस यंत्रणेला सहाय्य करणे अशा विविध कार्यात सहभागी होऊन वारी सुरळीतपणे पार पाडण्यास हातभार लावला.

आषाढी वारीत लाखो भाविक पंढरपूरात दाखल होत असल्याने पोलीस प्रशासनावर मोठा ताण असतो. अशा वेळी स्वेरीच्या स्वयंसेवकांनी 'सेवा हीच साधना' या भावनेतून कोणत्याही अपेक्षेशिवाय पोलीस मित्र म्हणून जबाबदारी पार पाडली. स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध कामामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यात मोठी मदत झाली असून वारकऱ्यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमात स्वयंसेवकांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, सावरकर चौक, अर्बन बँक परिसर, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा घाट परिसर, ६५ एकर परिसर, कॉलेज चौक, बसस्थानक परिसर, गौतम विद्यालय परिसर, रेल्वे स्टेशन, गोपाळपूर रस्ता, सांगोला चौक आदी गर्दीच्या ठिकाणी पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा बजावली.

**स्वेरीच्या स्थापनेपासून पंढरपूर मध्ये भरणार्या चारही वारीच्या काळात स्वेरी कडून विविध उपक्रम राबविले जातात ज्यामध्ये वारीपूर्व व वारीनंतरची स्वच्छता, पिण्याच्या शुद्ध पाण्याचे वाटप, पोलीस मित्र उपक्रम आदि बाबींचा समावेश आहे. या उपक्रमात स्वेरीतील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.**

या उपक्रमाचे नियोजन स्वेरीचे संस्थापक व सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या प्रेरणेने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे व प्रा. हेमंत बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी ही जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

स्वयंसेवकांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत पंढरपूर शहर पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या सामाजिक बांधिलकीची प्रशंसा केली. आषाढी वारीसारख्या भव्य धार्मिक सोहळ्यात युवकांनी समाजसेवेचे दिलेले हे योगदान इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. आषाढी वारीदरम्यान मोठ्या प्रमाणात सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापनासाठी पोलीस विभागाने विशेष नियोजन केले होते. या कार्यात स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी पोलिसांना सहकार्य करत स्वेरीच्या सेवाभावी कार्याची परंपरा कायम ठेवली.

---

# बी. एसी. पदवीधर वर्ग मित्रांचा ३५ वर्षानंतर स्नेह मेळावा : डॉ दस्तगीर मुजावर यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग ता. तुळजापूर येथील सन १९९ - ९१ मध्ये बी.एस्सी. पदवी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या सर्व वर्गमित्र ३५ वर्षानंतर एकत्र येऊन मित्रत्वाचा आनंद घेतला.तो क्षण म्हणजे मित्रत्वाचा आनंदी मेळवा असचं म्हणावे लागेल.



बालाघाट शिक्षण संस्था नळदुर्ग ता. तुळजापूर संचलित कला विज्ञान व महाविद्यालय नळदुर्ग येथे सन १९९ - ९१ या शैक्षणिक वर्षात बी.एस्सी. पदवी घेवून बाहेर पडलेल्या फिशरी ग्रुप मधील२० वर्गमित्र३५वर्षानंतर फुलवाडी येथील साई प्लाझा हॉटेल मध्ये एकत्र येऊन एक स्नेह मेळाव्याचा आनंद घेतला.

आपल्या महाविद्यालयीन जीवना मधील जुन्याआठवणींना उजाळा दिला.मित्र असावा गारव्यासारखा,जगाच्या पाठीवर रोज हजारो लोक भेटतात,पण रोज न भेटताही मनापासून आठवण काढणारी माणस फक्त भाग्यवंताना मिळतात ते म्हणजे मित्र असतात.अशा भावना प्रत्येकाने यावेळी व्यक्त केल्या.या प्रसंगी खानापूर ता. तुळजापूर येथिल आपला वर्ग मित्र डॉ.दस्तगीर मुजावर हा नेत्र चिकित्सा अधिकारी म्हणून सेवा निवृत्त झाल्यामुळे त्यांचा सर्व मित्र परिवाराच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

बालाघाट महाविद्यालयाच्या मत्स विभागाच्या सन १९९० - ९१ या शैक्षणिक वर्षातील वर्ग मित्राच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धरित्री विद्यालयाचे सचिव ड. सयाजी शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल साई साखर कारखान्याचे अधिकारी राजेंद्र काळाप्पा,माजी जि.प.सदस्य वसंतराव वडगावे,जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक महेश कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ दस्तगीर मुजावर यांनी तीस वर्षे वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक जाणिवेतून उत्कृष्ट कार्य केल्याने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात सेवावृत्तीनंतरचे आयुष्य व केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सिध्देश्वर बाड यांनी केले, सुत्रसंचलन डॉ प्रसन्न कंदले यांनी तर आभार एस.के. गायकवाड यांनी मानले.

या वेळी डॉ.प्रा.दिपक जगदाळे, मिलींद कुलकर्णी, सोमनाथ गायकवाड, राहुल लिमये, उध्दव कोठे, किसन साखरे, सुधीर पाटील, धनराज बरबडे, संजय पंडीत, डॉ.आनंद काटकर, प्रविणकुमार भोळे, राजकुमार बिरादार, विशाल कदम, संस्कार उपासे आदी उपस्थित होते.

---

# येडोळा येथे भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखेचे उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथे दि.२५ जुलै २२६ रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा चे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राजश्रीताई कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे तुळजापूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय बनसोडे व प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी,जिल्हा संस्कार विभाग उपाध्यक्ष बाळासाहेब बागडे,बौधाचार्य दादासाहेब बनसोडे, कैलास गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले.



या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना भारतीय बौध्द महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय बनसोडे म्हणाले की तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी संपूर्ण जगाला समता स्वातंत्र्य बंधुता आणि न्यायाची व मानवतेची शिकवण दिली असून तथागत भगवान गौतम बुध्दाच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून महामानव डॉ.बाबासाहेब आबेडकरानी देशतील सर्व नागरिकांना समान मानवी हक्क आणि मुलभुत आधिकार देणारे सर्वश्रेष्ठ भारतिय सविधान या देशाल दिले. प्रत्येक मानवाला आपापल्या धर्माच्या चौकटीत राहुन जिवन जगण्याचा आधिकार दिला असून बौध्द धम्म हा मानवी कल्याणचा मध्यम मार्ग आहे. तेंव्हा सर्व बहुजनानी बौद्ध धम्माचे अनुकरण करणे काळची गरज आहे.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम यांच्या हस्ते येडोळा ग्राम शाखेचे उद्घाटन करून नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली ती पुढील प्रमाणे अध्यक्ष सुवर्णा लोंढे, सरचिटणीस रागिणी लोंढे, कोषाध्यक्ष रतन लोढे, उपाध्यक्ष सारिका भानुदास लोढे, संस्कार उपाध्यक्ष महादेवी लोढे, संस्कार सचिव उषाबाई लोंढे, संरक्षण सचिव सानिका लोंढे, महिला उपाध्यक्ष स्नेहा लोंढे, महिला सचिव शितल लोंढे, पर्यटन उपाध्यक्ष करुणा लोंढे, पर्यटन सचिव सुनीता लोढे,संघटक सुजाता लोंढे,सारिका नागेश नवसाबाई लोंढे, सुनिता वाघमारे, शालुबाई लोंढे, पार्वती लोढे, मनिषा काबले, अमित लोंढे, सागर गायकवाड, चिमनराव शिगर आदींची निवड करण्यात आली.

या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे शरद बागडे कांचन चिमणे, प्रवीण मुखरे सुहास साबळे सिद्धार्थ बनसोडे, उमेश गायकवाड, सुरेश लोंढे, रामचंद्र लोंढे,देवानंद लोंढे, डॉ.सुरज लोंढे,भानुदास लोंढे, सह कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अमर जेटीथोर यांनी केले शेवटी गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आले.

---

**निफाड माध्यमिक शिक्षक पतसंस्थेची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न**

# सदैव अत्याधुनिक व सभासदाभिमुख सेवा देण्याचा निर्धार : अध्यक्ष साहेबराव बर्डे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर पतसंस्थेवर सभासदांचा विश्वास आणि सहकार्यामुळेच संस्था आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होत आहे. भविष्यात अत्याधुनिक आणि सभासदाभिमुख सेवा देण्याचा निर्धार असल्याचे संस्थेचे चेअरमन तथा नगरसेवक साहेबराव बर्डे यांनी सांगितले. ते निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या २७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

**संस्थेचे भागभांडवल ९ कोटी ६७ लाख रुपये असून संस्थेला सन २०२५-२०२६ यावर्षी ७८ लाख ४२ हजार ६४९ रुपये इतका नफा झालेला आहे.संस्था सभासदांना ६.२५% इतका लाभांश देणार आहे, खेळते भागभांडवल ३२ कोटी ८६ लाख २९ हजार १२५ रुपये असून ठेवी १८ कोटी ४१ लाख आहेत. कर्जवाटप २७ कोटी ४० लाख २५ हजार आहे.**

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थापक, शिक्षकनेते शिवाजीराव निरगुडे, संस्थापक चेअरमन कैलास भारती, विद्यमान चेअरमन साहेबराव बर्डे, व्हा. चेअरमन हेमलता जाधव, कार्यवाह भगीरथ सोनवणे, संचालक खासदार भास्करराव भगरे, रामराव बनकर, बाळू गुंजाळ, किरण जाधव,राहुल दवते,गणेश महाले, बाळकृष्ण वाजे, संचालिका सोनाली होळकर, सुजाता तनपुरे,स्वि. संचालक बाळकृष्ण शिंदे,महेंद्रसिंग राजपूत आदी मान्यवर होते.

वार्षिक सभेत सभासद मंगेश कागदे, ज्ञानदेव ढोमसे, के. सी.चौधरी, भालचंद्र सूर्यवंशी आदींनी विविध विधायक सूचना मांडल्या. त्यावर चेअरमन बर्डे यांनी सूचनांचे स्वागत करून आवश्यक त्या बाबींची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी सन २०२५-२६ चा अहवाल वाचन, आर्थिक पत्रके, नफा वाटणी,पुढील वर्षाचे अंदाज पत्रक, दोष दुरुस्ती अहवाल, पोटनियम दुरुस्ती, नफा-तोटा पत्रक,लेखापरीक्षनकांची नियुक्ती आदी विषयांना सभेत मंजुरी देण्यात आली.

तसेच त्यानंतर ४६६ सभासद असलेली निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या चांगल्या कामकाजाबद्दल लेखापरीक्षनाचा अ वर्ग मिळालेला आहे.पतसंस्थेत नेहमी सभासदांचे हित जोपासले जाते. नाशिक जिल्ह्यात सभासदांना सर्वात जास्त कर्जवाटप करणारी एकमेव कर्मचारी पतसंस्था असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

याप्रसंगी एन.डी.एस.टी. चे संचालक समीर जाधव, मुख्याध्यापक नितीन कडलग, ज्ञानदेव ढोमसे, प्रभाकर सांबरे, एन.एल.जाधव, बाळू मातेरे, भालचंद्र सूर्यवंशी, संतोष बिऱ्हाडे, मंगेश कागदे, नरेश चौरे, शालिग्राम बोरसे, संदीप चकोर, रशीद पठाण, हेमंत खैरनार, महेश अहिरे, अनिल कुंभार्डे, वैभव कर्डिले, नितीन डोखळे, कृष्णराज बनकर, भूषण सोनवणे, नितीन कापडणीस, सुनील होळकर, जालिंदर कडाळे, गोरक्षनाथ पवार, किरण खैरनार, रमेश वडगुले, बद्रीनाथ रायते, मंजुषा रायते, संदीप दाभाडे, जगन्नाथ भोसले, व्यवस्थापक रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे आदींसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेचे सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार बाबा गुंजाळ यांनी मानले.

